# पालकच सहशिक्षकाच्या भूमिकेत

## सतरा शाळांमध्ये उपक्रम ; आकांक्षा फाउंडेशन आणि रॉकेट लर्निंग संस्थेचा पुढाकार

सकाळ EXCLUSIVE

**उपक्रमाची वैशिष्ट्ये**

- शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना सामावून घेतले.
- वस्ती व झोपडपट्टीतील ५०० लहान मुलांचा समावेश.
- संवाद कौशल्यासह विविध कृती करून घेण्यावर भर.
- आई-वडिलांना प्रशिक्षण आणि प्रत्येक आठवड्याला बैठक.

**पुणे, ता. १७ :** ''माझा मुलगा ज्युनिअर केजीमध्ये शिकत आहे, परंतु यावर्षी त्याची शाळाच सुरू झाली नाही. घरात बसून कंटाळलेल्या मुलाला कसे शिक्षण द्यायचे, आपण कसे शिकवायचे हा प्रश्न आमच्यापुढे होताच. आकांक्षा फाउंडेशनच्या शाळांनी आम्हाला मुलांना कसे शिकवायचे, त्यांच्याकडून विविध कृती कशा करून घ्यायच्या याचे प्रशिक्षण दिले. आता दीड महिना होऊन गेला, आम्ही आई-वडीलच शिक्षकाच्या भूमिकेत असून, मुलांमध्येही मोठा बदल झाला आहे,'' कासारवाडी येथील पालक कानिफनाथ डोंगरे सांगत होते. अशाच पद्धतीने आता वस्ती व झोपडपट्टी भागातील सुमारे ५०० लहान मुलांना शिक्षणाचे धडे दिले जात आहेत.

आकांशा फाउंडेशनतर्फे पुणे व मुंबईतील महापालिकेच्या शाळा चालविल्या जातात. झोपडपट्टी भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. फाउंडेशनने लॉकडाउनच्या काळातही विद्यार्थ्यांच्या अभ्यासासह त्यांची मानसिक स्थितीची काळजी घेतली होती. ऑनलाइन शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना टॅब उपलब्ध करून दिले आहेत. झोपडपट्टीतील ४ ते ७ वयोगटातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले. या मुलांना **पान ६ वर »**

> लहान गटातील मुलांच्या शाळा पुढील सहा महिने सुरू होण्याची शक्यता नाही. त्यांचे नुकसान टाळण्यासाठी पालकांनाच सहशिक्षक म्हणून भूमिका निभावण्यासाठी तयार केले. दर आठवड्यातला शिक्षक व पालकांची बैठक होत असून त्यामध्ये विद्यार्थ्यांकडून कसे उपक्रम राबविण्यासाठी सूचना दिल्या जातात. सध्या पुण्यातील ९ आणि मुंबईतील ८ शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम सुरू केला आहे.
>
> **– जयश्री ओबेरॉय,** शाळा संचालक

# पालकच सहशिक्षकाच्या भूमिकेत

**» पान १ वरून**

शाळेत बोलाविणे शक्य नसल्याने त्यांच्याच पालकांना प्रशिक्षण देऊन शिक्षकांची भूमिका स्वीकारायला लावली. रॉकेट लर्निंग संस्थेच्या माध्यमातून हा उपक्रम राबविला जात आहे. ''विद्यार्थ्यांना काय शिकवायचे आहे, हे पालकांना सोप्या भाषेत शिकवले जात आहे. त्याप्रमाणे विद्यार्थ्यांकडून चित्र काढून घेणे, वस्तू ओळखणे, बडबड गीत म्हणून घेणे व त्याचे व्हिडिओ तयार केले जात आहेत. वर्गशिक्षकांकडून प्रत्येक विद्यार्थ्यांची प्रगती कशी सुरू आहे यावर लक्ष आहे. या उपक्रमामुळे आपली मुले शाळाबाह्य होतील अशी पालकांना भीती होती ती आता दूर झाली आहे,'' असे रॉकेट लर्निंगच सिद्धांत सचदेवा यांनी सांगितले.



**पुणे : आकांक्षा फाउंडेशनतर्फे चालविल्या जाणाऱ्या ऑनलाइन शाळेत सहशिक्षिका झालेली आई व अभ्यास करणारा मुलगा.**